प्रकाशन दिनांक १-८-२०१७

**कथा**

माधव
जाधव

# दुःखाचे टॉवर, सुखाची रेंज

‘काय चाललं सायबूदा?’

‘काई नायी.’

मोटारसायकलला ब्रेक मारत दा थांबला. शुक्रवारचा बाजार असल्यामुळे हदगावात मध्यवर्ती बँकेपुढे गर्दी दिसत होती. बाजाराच्या गर्दीतला प्रत्येक जण चिंतेत होता. ‘काय म्हणते पाणी?’‘बरंच कमी झालं,’ असं राहूनराहून एकमेकांना विचारत होता. आठवड्याला भरणाऱ्या भाज्यांचे भाव चांगलेच वधारलेले. तशी सामान्य माणसाला कुठे असते भाजीभाल्याची गरज; पण याच बाजारात मालकलोक आठभराच्या मजुरीचे पैसे देतात. त्यातूनच मीठ-मिरची, दाळ-दाणा घेता येते. पाव्हण्यारावळ्यांची गाठभेट होते त्यामुळेच हदगावच्या परिसरातील शेतकरी आणि मजूर नित्यनेम बाजारला येतात. तसेच आज आलेले. बँकेपुढच्या मेवाड हॉटेलपुढे गाडी लावत सायबूदा मला म्हणाला,

‘कव्हा आला?’

‘हे काय आताच की-’

‘गावाकडं जातू?’

‘हो’ म्हणत मी जाग्यावरच. तो हॉटेलच्या दरवाजाकडे जात म्हणाला, ‘ये, च्या घेऊ-’

त्याचा शब्द मला टाळता येत नसे. हॉटेलमध्येही गर्दी होती. मालकाने स्वतः येऊन पहिल्या दोन गिऱ्हाइकांना उठविले आणि टेबलकडे हात दाखवत म्हणाला,

लेखक आखाडा बाळापूर, जि. हिंगोली येथील नारायणराव वाघमारे महाविद्यालयात मराठीचे अध्यापक आहेत.
ईमेल mrjadhav1995@gmail.com

'बसा पाटील येथं-'

तेवढ्यात वेटरने दोन ग्लास पाणी आणून टेबलवर आदळले. अन् म्हणाला,

'बोला, काय देऊ पाटील?'

एवढा उत्साही वेटर मी पाहिला नाही. खिचडी-भजे, चहाची ऑर्डर ऐकावी त्याच्याच तोंडून.

सायबूदाने चहाची ऑर्डर दिली, तसा तो भट्टीकडे पाहत पहाडी सुरात उद्गारला,

'दो चाय कडक मिठ्ठी, 'डायमंड' पाटीलसाहाब को!'

दूध कमी अन् पाणीच जास्त असणाऱ्या दुधाचा चहा कधी कडक होणार! हा मालक आमच्याच गावचं चार जणांच दूध घेऊन पहिल्यांदा कच्चचं तापवणार. त्यावरील सायमलई काढून नंतर त्यात पाणी टाकणार. अन् त्याचा चहा करून दिवसभर आम्हाला पाजणार. आम्हालाही बरं वाटावं, आपल्याच खात्रीच्या दुधाचा चहा पितो म्हणून.

सहजच पुन्हा मी म्हणालो, 'काय चाललं?'

त्यावर सायबूदा पाण्याचा ग्लास खाली ठेवत उद्गारला,

'काय चालणार हाय आमचं गरिबाचं-'

हे वाक्य तसं त्याचं नेहमीचंच; पण आज तो मूडऑफ दिसत होता. नेहमी हसतमुखानं बोलणारा दा, पण-त्याच्या पुढच्या वाक्यानं मलाअंतर्मुख केलं. टेबलावर साचलेल्या पाण्यात बोट बुडवत तो म्हणाला,

'मास्तर, तुमचं बरं हाय. वाळायचं नायी,चिभडायचं नायी. दर महिन्याला पगार घट्ट. सरकारचे जावाई तुमी!-'

'काय म्हणायचं तुला?'-मी

'काय, बोलावं तेवढं कमी हाय, मास्तर. मी आतापसरोक कामानं थकलो नव्हतो; पण आता थकलो.'

'झालं तरी काय?-'

'पाणी कमी झालं' बोअरचं-

'हो'

त्याचा हा शब्द कानावर पडताच माझी कानठळी बसली. नेमकाच दोन वर्षांनी मी एकरभर ऊस लावलेला. पाणी कमी झाले तर कसे होईल. मास्तर असून मला काळजी. त्यात सायबूदाचे काय झाले असेल. त्याच्या डोळ्यांत पाणी आलं. पाण्याची कधीच कमतरता न भासलेल्या साहेबरावला या वर्षी पाणी दगा देऊ पाहत होते. बोअरचे पाणी कमी होऊन ते त्याच्या डोळ्यांतून ठिबकत होते. दोन पिढ्यांपासून मळेकरी असणारा साहेबराव शेती करायचा. बालपणाचा तो माझा मित्र. दोन वर्षांनी मोठा असल्यानं दादा. 'ज्याच्या घरी मळा त्याचा खिसा वाजे खुळखुळा, नोटाचा पत्ता नाही खुर्दाच सगळा!' या बालपणीच्या वाक्याची आठवण झाली. दोघेही भूतकाळात शिरलो. डोळ्यांचे पाणी पुसत भानावर येत तो अवघडल्यासारखं बोलू लागला-

'कसं व्हईल आमचं...' तुमीच सावरू शकता आमाला. तवाच लहानसान नवकरी पाह्यली असती तर ही येळ आली असती का. किती राबावं काहीच हातचं नायी. कसंय, यधळोक पाणी व्हतं बरं व्हतं. काहीतरी हाताला लागत व्हतं. नायी तरी कव्हाय आमचे कोळशाचे हात काळेच. बरं हाय, तोंड काळं करायची येळ येत नाही.'

'काय मनतू काय दा तू!' यापलीकडं मला बोलता येत नव्हते. चहा पिऊन झाला होता. हॉटेलमालकाला आम्ही उठावे असे वाटत होते. त्याचे सगळे लक्ष आमच्याकडेच. त्यामुळे बील देऊन आम्ही बाहेर आलो. बाहेरच्या बाकड्यावर कुणी नाही बघून तेथेच टेकलो. विषय गंभीर होता. येणारा-जाणार सोयरा आम्ही आमच्यात तंद्रीत असलेले बघून दुरूनच रामराम करून पुढे जात होता. दाला मात्र आज माझ्याशी खूपच बोलायचे

होते. गडबड असूनही त्याचे ऐकून घेणे मला महत्त्वाचे वाटत होते.

'हे सगळं मह्या बापानं केलं गड्या मास्तर. तुला त माहीत हाय, ते कसा हिटलर हाय! माती केली आमची. लहानग्याला तरी लावील वाटलं कोठं नवकरी; पण ते बी नायी. जमीनच काय सोनं हागायली! व्हती की याची. कळणं मला. सारखं सांगीत राहते, 'पाटील हाव आपण, पाटील हाव! काय कमी हाय आपणाला.' सात-सात वर्षं फुकट कोठं गांड घासावं नाऊन ग्रँटवर. त्याच्यापरता आपल्या जमिनीचा कारभार पाह्यला त बरा नायी का. अन् कोण हाय दुसरं हे पाह्यला मनते. जसा काय टाटा अंबानीचाच कारभार हाय याचा! कडक इस्तरीचं कमीज अन् टाईट काष्ट्याचं धोतर नसेलं की, निघाला हादगावला खांद्यावर रुमाल टाकून. दिवसभर बसते त्या दत्त कापड दुकानवर. त्यालाय हुद्दा नायी आन् यालायबी! पाटील, पाटील म्हणलं तेवढाच मोठेपणा!'

त्याचे बोलणे थांबवत मध्येच मी-

'तव्हा त लयी म्हणत व्हता की सायबूदा, मह्या, बापाचं बराबर हाय मनून!'

जणूकाही मध्येच कॉल कटल्यासारखा तो थोडा थांबला अन् रिडायल करून कॉल लागावा तसा पुन्हा सुरू केला बोलायला-

'तव्हा कळत नव्हतं. तुही शाळा नॉन ग्रँट व्हती. तव्हरोक वाटायचं, कहाला करत असंल ब्वा हे नवकरी; पण आता मूर्खपणा वाटते मास्तर. मव्हा बाप पाटीलकीच्या तोऱ्यात गेला अन् आमचंबी कबंरडं मोडलं त्यानं. बोलताच येत नाही न त्याच्यापुढं-'

'बेकारच हाय गड्या कुणब्याचं!' -मी

'कोणं सांगावं मह्या बापाला-'-सायबू

'जाऊ दे, आता तुह्या हातात कारभार आलानं-'

'काय चाटतू का त्या कारभाराला! पंचवीस वर्साचा मळेकरी मी. दमडी उरली नायी. एवढ्या वरसानं. लगन केलं ब्वा ताईचं तेवढं!'.

'कसं मनतू दा, आरसीसी घर झालं. टॅक्टर झालं. हिंग हे दुसरी गाडी व्हय होडांची!.'

'तेवढं हाय मातर. गांडीत मातोडा जावोस्तोर काम करावं लागते, ते गेलं कोणीकडं. कर्ज किती हाय उरावर पाहतू का!'

'आमचंय काही खरं नायी रे ब्बा. सात वरसं फुकट घासलं की, नायी तुह्यादेखत. अन् आता पगार सुरू झाला त हिंग दुसराच हेड्याक डोस्क्याला!'

'वा रे वा! मला शिकवायला-'

माझे टेंशन त्याला माहीत नसल्याने त्याला माझी नोकरी बरी वाटत होती अन् नोकरी फक्त उपाशी मरू देत नाही, एवढेच काय ते, हे मला त्याला पटवून सांगता येत नव्हते.

एम.कॉम बी.एड. झालेला साहेबराव साधारण चांगल्या घरचा असल्याने बाप नोकरीला लावेल, असेच कोणालाही वाटायचे. लग्नाच्या वेळेला एका शिक्षिका मुलीचे स्थळ त्याला आले होते; पण बाप स्वतःला घरंदाज पाटील समजत असल्याने त्याची सून नोकरी कशी करणार म्हणून नाकारलं त्यांने सायबूच्या मनात खूप होते. भीतभीत बापाला समजावण्याचा प्रयत्नही त्याने केला. दोन दिवस जेवला नाही तो. पण, काय उपयोग! माय म्हणत होती, ऐकत नाहीत ते, जाऊ दे. अन् सायबूच्या गळ्यात बारावी शिकलेली गजानन देशमुखांची मुलगी पडली. हुंडा खूप दिला. लग्न थाटात केले. तेव्हा बरे वाटले; पण पुढे काय?

दाची अन् माझी ताटातूट मला नोकरी लागल्यापासून झालेली. तरीही तो फोनवर अधूनमधून बोलणार. गावाकडे गेलो म्हणजे भेट होणारच. इतके दिवस त्याला काही वाटत नव्हते;

पण आज तो पुरा खचला होता. बापापुढे बंडखोरी न केल्याचे दुःख आज त्याला सलत होते. विषय थांबविण्याच्या बेताने मी म्हणालो,

'बरं जाऊ दे पाण्याचं, पुढं काय?'

'पाहतो एकदा पाणी, शेवटचा मारतो एक बोअर-'

'कोण पाहतो पाणी?'

'उमरखेडचा ढवळे मास्तर-'

'त्याला कसं कळतं?'

'काही नाही, जेथं पाणी पाह्याचं तेथं तो नारळावर तळपाय ठेवून भोईवर हात टेकून बसतो; अन् दुसऱ्या माणसाला हातात नारळ घेऊन दमानं त्याच्या भवताल फिराय लावतो!'

'मंग-'

'मंग काय, त्याच्या पायखालचं नारळ जवा गर्रर्र फिराय लागतं अन् ते त्यालाय फिरवतं, तवा नारळ हातात असणाऱ्या माणसाला तो जागीच थांबाय लावतो. मग तेथं एक खुटी ठोकाय लावतो. तोच बोरचा पाइंट!-'

मला कहाणी ऐकल्यासारखे वाटत होते.

'मंग त्या पाइंटवरच बोअर मशीन फिट्ट-'

'मंग तेथं लागते पाणी?'-मी

'आतापसरोक एकयं बोर फेल गेला नायी त्याचा!'

'काय, ढवळे मास्तर म्हणला का?'

'हो! सटवाईमाता शाळंवर मास्तर हाय. एक नायी, सात बोर मारले त्याच्या हातानं लोकायनं!'

'मंग डोळ्यांत पाणी आणाय काय झालं तुला?'

'मास्तर तुला कसं कळत नायी-'

'काय?'

'पाणी लागते रे, ब्वा, पण कोणाला किती लागंल हे कोठं कळते त्याला-'

'असं हाय व्हय!' म्हणत मी माझ्याशीच मुक्याने 'वारे च्युत्या बनविण्याचा धंदा!'

थोडं थांबून-'मंग तसं त आपल्या जमिनीत कोठंय पाणी हायच की!' मी उठतउठतच म्हणालो,

'तसं कसं लागंल मास्तर?'

'बरं जाऊ दे, पाणी लागलं नाही तर?'

'मंग काय-' तो गंभीर झाला. त्याला काही बोलता येत नव्हते. त्याच्या खांद्यावर हात टाकत मी म्हणालो, 'नुसतं शेतावरच आवलंबून राहत येत नाही गड्या!' माझ्या या एकाच वाक्याने तो सावरला. त्याचे विचारचक्र गतिमान झाल्यासारखे दिसते होते.

त्याला खूप काही सांगायचे होते; पण बराच वेळ झाल्याने मी गावाकडे जाण्यासाठी निघालो.

'गावाकडे गाडीवर सोडतो,' म्हणत तो तयारच. पाच किलोमीटरवर गाव. मध्येच माझे शेत होते. 'जातो माझा मी,' म्हणत त्याला कसेतरी थांबवले.

शेतापर्यंत रोजच्या ऑटोने निघालो. मला रस्ता नवा नव्हता; पण तसा वाटत होता. सगळीकडे नेहमी हिरवे असणारे रान आज नजर जाईल तिथपर्यंत काळशार अन् उजाड दिसत होते. कारखान्याला जाण्यास उशीर झालेल्या उसाचे रान पिवळे पडत चालले होते. रस्त्यालगच्या उसाची हाडे उघडी पडत व्हती. पाचटीचा जीव जात होता. त्याच्यानेच माणसाच्या विचाराची रेंज राहूनराहून गायब होत होती. 'कसं व्हईल आता,' असे प्रत्येकाला वाटत होते. उमरीच्या परिसरातले सुखाचे टॉवर राहूनराहून रेंज गायब करत होते. अन् त्याच जागी दुःखाची पावरफुल रेंज येत होती. कोरडवाहूची बिनापाण्यानं, तर ओलीतवाल्याची अर्धवट पाण्याने चांगलीच हजामत होत होती.

बखाड पडल्याने सर्वांनीच नवीन ऊसलागवडीचे क्षेत्र कमी केलेले. गावाची बागायतच धोक्यात आलेली. त्यामुळे कोणीही हिंमत करीत नव्हते. ज्याच्या बोअरला चांगले पाणी, त्यानच थोडाफार

ऊस लावण्याचा विचार केलेला.

तुम्ही म्हणाल, एकाच वर्षाच्या बखाडीने असा काय फरक पडणार?, पण, राजेहो, ऊस असो की कापूस खर्च जाऊन त्याच्यातून काय उरते? 'खाऊन पिऊन टामटूम' असे आमचे तुकाराम पाटील म्हणायचे. एवढे असून पोरीच्या लग्नाला व्याजबटा करावाच लागतो. घर बांधायचे, तर एका वर्षात कोठे होते? उसाचे उत्पन्न एकराला तीस टन. हातात पैसा येण्याच्या आधीच दुप्पट खर्च. कळले का आता! मग घोर लागणार नाही तर काय. बखाड काही याच वर्षी पडली नाही. ती चारपाच वर्षांपासून आहे.

या वर्षी पावसाळा खूपच कमी झालेला. खरिपाचा हंगाम कसाबसा हाताला लागला; पण रब्बीचे काय...उमरीत तसे उसाचेच क्षेत्र जास्त...कारखाना जवळ असल्याने मेहनत कमी अन् उत्पन्न भक्कड, अशी आमची भावना. खाल्लाकडून नदी अन् वरलाकडून तळे काही बागायत नदीच्या पाण्यावर तर काही बोअरच्या पाण्यावर....बोअर तरी किती...ऐंशी फुटांपासून चारशे फुटांपर्यंत...पंचवीस वर्षांत कधी पाणी कमी नाही...गेल्या चारपाच वर्षांपासून मात्र कमी पडत आहे... या वर्षी जुलै-ऑगस्ट महिन्यात चार-दोन वेळा पाऊस पडला. श्रावणमासी हर्ष मानसी म्हणायची वेळही आली नाही...धरणीमायची तहानही नीट भागली नाही. तिला नको असताना उसाच्या निमित्ताने जबरदस्ती पाणी पाजणारे आम्ही आज हतबल झालो...या वर्षी पावसाळ्यातही उसाचे पाणी नाही बंद करता आले ...मुळात आजपर्यंत पाणी देण्याची पद्धतच आमचची चमत्कारिक... उसाच्या दहा सऱ्याला एकदाच पाणी लावायचे... ते पाणी पांदीने गावात येईपर्यंत त्याच्याकडे दुर्लक्ष, इतकी पाण्याची काळजी...एकाच शेतात तीन-तीन बोअर... बेसुमार उपसा-ना तुषार ना ठिबक... त्याच्यानं बोअर आटत चाललेले.

झंझट नसणारा ऊस आज सर्वांना काळ भासत होता. सगळीकडची हिरवी कळा जाऊन पिवळी होत होती. मार्च  महिन्याची चाहूल लागलेली... कोणी-कोणी एकामागून एक नवीन बोअर मारीत होते; पण पाहिजे तेवढे पाणी लागत नव्हते. नदी कोरडी पडली होती पिपरीच्या बंधाऱ्याने तिची इज्जत  या वर्षीपर्यंत उघडी पडली नव्हती, ती या वर्षी पडली. इसापूरच्या धरणाचे पाणी कॅनालमध्ये जेवढे सोडले तेवढेच नदीत सोडले जाई; पण धरणच कोरडे होत चाललेले. बोअर मशीनचा आवाज माणसाचे कान सुन्न करीत होता. कुणीतरी येऊन म्हणायचा, लागलं ब्वा पाणी! फला न्याला पण टेस्ट करताच हिरमोड व्हायचा. एक नाही-दोन नाही, तब्बल पन्नास-साठ बोअर झाले; पण पाहिजे तेवढे पाणी नाहीच. म्हणतात, ना 'विहितच नाही तर पोहऱ्यात कोठून येणार.' दरवर्षी ऊस कारखान्याला जात होता. एकरकमी पैसा येत होता. मागचे कर्ज फेडून उरलेल्या पैशातून पोरीच्या लग्नाचा, नवीन घराचा विचार होत होता. खपरेल घर जाऊन गावात बरीच आरसीसी घर झालेली. घरात कलर टी.व्ही., गॅस अन् काही घरी हिरो होंडा मोटारसायकल आली होती. असे गाव बदलत होते; पण ज्या पाण्याने गावाचा कायापालट केला त्या पाण्याच्या नियोजनाचा विसर गावाला पडलेला. रस्त्यातच उतरून शेतात गेलो दादा वहिनीची भेट घेऊन सगळीकडे फिरलो. सायबूदाचे म्हणणे तेच दादाचे होते. दहा-वीस जण एकत्र येऊन कॅनॉलच्या सायबांना भेटण्याचा विचार ते करत होते. उन्हाळ्यात जनावरांना सोडण्यात येणाऱ्या पाण्यात थोडी वाढ करा म्हणून निवेदन देणार होते. सगळ्यांना भेटून परत आलो.

अधूनमधून सायबूदा आणि भावाला फोन करत

होतो. मध्येच एके दिवशी सायबूदाचा फोन आला-
'हॅलो मास्तर-'

'बोल सायबूदा-'

'काही नाही एक इच्चारावं म्हणतो तुला-'

'इच्चारनं-' ❊❊

'हदगावला एक ड्रेसेसचं दुकान टाकाव म्हणतो-'

मला आश्चर्याचा धक्काच बसला. चटकन वीज चमकल्यासारखी 'नुसतं शेतावर अवलंबून राहायचेच नाही गड्या' या माझ्या वाक्याची आठवण झाली. तरीही स्वतःला सावरत मी म्हणालो,

'चांगलंच हाय की!'

'लगनसराई हाय. बखाडीच्यानं शेतात कामधंदा नायी. म्हणून मनलो टाकावं. त्याच्यासाठीच फोन केला-'

'भांडवलाच कसं?' -मी अंदाज घेण्यासाठी बोललो.

'पाच लाख देतो म्हणतात पीपल्स बँकेचे मॅनेजर. जवळ हात लाख खांड. घरी काय बसावं माशा मारत, बरं नाई का'

'एकदम झकास!' मी त्याला प्रोत्साहित करण्याच्या सुरात म्हणालो

'नाही तरी आमचा बाप दत्त कापड दुकानार बसतेच की. ते आपल्या गल्ल्यावर बसंल अन् आपण करूत गिऱ्हाईक. लहानगं पाहते टॅक्टर, शेती. त्याच्यासोबत गडी हायच की.

'ते जाऊ दे; पण तुव्हा इच्चार पटला गड्या! कर लवकर तयारी-'

'त्याला काय, आठ दिवसांत मिळंल लोन. पुढे सीसी करा मनायलेत मॅनेजर. सेटरय पाह्यलं. पाचला पाच लाखाचा माल भरतो. अमरावतीहून. होलसेल भेटते मनं तेथं. अन् एक लाखांचा फर्निचर. पुढे पत झाली की चालते पुढचं-पुढे!,' तो बराच बोलला. माझ्या होकाराने त्याला बळ मिळाले होते. शेवटी तो म्हणाला, 'करू पक्कं मंग?'

मी एका झटक्यात म्हणालो 'शंभर टक्के!'

'मंग आता तरी म्हणणार हाय का नाही बंडखोर मला!-'

मला हसू आले. त्याने फोन ठेवला. त्याच्यापेक्षा मला आनंद झाला होता. आपला मित्र इतक्या झटपट निर्णय घेतो, बदल स्वीकारतो, याचे कौतुक वाटत होते. एम.कॉम, बी.एड् करून मिळालेल्या शिक्षणाचा खरा फायदा आता त्याने केला, असं मला वाटत होते.

सुखाचे कव्हरेज वाढविण्यासाठी कुणीतरी येऊन टॉवर उभारणार नसते, ते आपल्यालाच उभारावे लागते. तेव्हा कोठे दुःखाच्या टॉवरखालीसुद्धा सुखाची रेंज येऊ लागते.

अन् त्याची तयारी केली होती सायबूदाने.

मला उगीच वाटले खेड्यातल्या प्रत्येकानेच असा बदलण्याचा विचार केला तर...!

●

परिवर्तनाचा वाटसरूची वर्गणी बँक ट्रान्सफरने भरण्यासाठी तपशील
बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे
बचत खाते : परिवर्तनाचा वाटसरू
बचत खाते क्र. : 051410110013969
आयएफएससी क्र. : BKID0000514
एमआयसीआर क्र. : 411013014

**पैसे ट्रान्सफर केल्यानंतर ७७७६९०२२६७ या क्रमांकावर एसएमएस द्वारे अथवा pwatsaru@yahoo.com या ईमेलवर कळवावे.**